# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, कृषी नगर, अकोला ४४४ १०४

वाचा: १) जाहिरात क्र. पंदेकृवि/आस्था/ जाहिरात/२०१६ (०१), दि. १४ डिसेंबर, २०१६
२) विद्यापीठ सुचना क्र.पंदेकृवी/ जाहिरात/भप्र/२०१७, दि. ११ ऑक्टोबर २०१७

## लेखी परिक्षेबाबत सुचना

क्र.पंदेकृवी/ जाहिरात/लेप/२०१८ दिनांक १२ जानेवारी २०१८

डॉ. पं.दे.कृ.वी. अकोला अंतर्गत कृषी सहायक (पदवीका), कृषी सहायक (पदवीधर) संवर्गासाठी घेण्यात येणा-या लेखी परिक्षेचा अभ्यासक्रम आणि ऑनलाईन पध्दतीने प्राप्त झालेल्या अर्जातील माहितीचे आधारे उमेदवारांच्या तात्पुरत्या स्वरुपाच्या पात्र व अपात्र यादया विद्यापीठाचे संकेतस्थळ www.pdkv.ac.in वर यापुर्वीच प्रसिध्द करण्यात आलेले असून यादयांवरील प्राप्त आक्षेप विचारात घेवून आक्षेप अहवाल सुध्दा संकेतस्थळावर प्रसिध्द केला आहे.

अशाप्रकारे प्राथमीकदृष्टया पात्र उमेदवारांची लेखी परिक्षा खालील प्रमाणे नियोजीत करण्यात आली असून, उमेदवारांना लेखी परिक्षा प्रवेशपत्रासाठीची लिंक दि. १७.०१.२०१८ पासून विद्यापीठ संकेतस्थळ www.pdkv.ac.in वर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. उमेदवारांना प्रवेशपत्राशिवाय (Hall Ticket) परिक्षेस बसण्याची परवानगी दिली जाणार नाही. सदर लेखी परिक्षा अकोला व नागपूर या दोन शहरांमध्ये आयोजीत करण्यात येणार असून, परिक्षा केंद्रासंबंधी माहिती उमेदवारांचे प्रवेशपत्रावर तसेच विद्यापीठाचे संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

| अ.क्र. | पदाचे नावं | लेखी परिक्षा दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | कृषी सहायक (पदवीका) | दि. ११.०२.२०१८ | सकाळी १०.०० ते १२.०० |
| २ | कृषी सहायक (पदवीधर) | दि. ११.०२.२०१८ | दुपारी ३.०० ते ५.०० |

उमेदवारांना संकेतस्थळावरुन प्रवेशपत्र प्राप्त करण्यास काही अडचण आल्यास त्यांनी ०७२४-२२५८६०६ वर संपर्क साधावा अथवा स्वत:चे नांव, जन्म तारीख व पत्ता असलेले फोटो ओळखपत्र सोबत आणून संबंधित पदांच्या लेखी परिक्षेच्या दोन दिवस अगोदर संगणक केंद्र, डॉ.पं.दे.कृ.वि, अकोला येथून प्रवेशपत्र प्राप्त करुन घ्यावे.

लेखी परिक्षेसाठीची पात्रता उमेदवारांनी ऑनलाईन भरलेल्या माहितीच्या आधारे ठरविण्यात आली आहे. त्यामुळे लेखी परिक्षेनंतर गुणवत्ता प्राप्त उमेदवारांना रिक्त पदांची संख्या विचारात घेता पुरेशा प्रमाणात आवश्यक कागदपत्रांसह बोलावण्यात येईल व त्यांची योग्यता कागदपत्र पडताळणीअंती ठरविण्यात येईल. त्यावेळी उमेदवारांकडून ऑनलाईन भरण्यात आलेली माहिती चुकीची, असंबंधीत अथवा दिशाभुल करणारी आढळून आल्यास असा उमेदवार गुणवत्ता यादीत अग्रस्थानी असला तरी त्यास त्याक्षणी अपात्र ठरविण्यात येईल याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

कुलसचिव,
डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला